// स्त्रीशक्तिस्तुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ-२०१९/जापं-प्रिध-/का-०७/1142
दिनांक :- ०६.०६.२०१९.

प्रति,
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हा- धुळे.

विषय :- 'धुळे जिल्हयामध्ये जातपंचायतीच्या सदस्यांनीच केला अतिप्रसंग- गर्भपातास नकार दिल्याने कुटुंबियांना टाकले वाळीत' यासंदर्भात प्रसिध्दी माध्यमावर प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत.

माननीय महोदय,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अंतर्गत कलम १० (१) (फ) (एक) व (दोन) नुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगास स्त्रियांशी निगडित प्रकरणे स्वीकारणे आणि त्या बाबींची स्वाधिकारे दखल घेण्याचे अधिकार प्राप्त करण्यात आले आहेत.

**'धुळे जिल्हयामध्ये जातपंचायतीच्या सदस्यांनीच केला अतिप्रसंग- गर्भपातास नकार दिल्याने कुटुंबियांना टाकले वाळीत'** यासंदर्भात प्रसिध्दी माध्यमांवर प्रसिध्द झालेल्या बातमीची आयोगाने दखल घेतली आहे. प्रसिध्दी माध्यमांवर प्रसिध्द झालेल्या बातमीमध्ये तथ्य असल्यास, हा प्रकार गंभीर स्वरुपाचा -आहे. या प्रकरणी आपल्याकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर कृत्य हे गंभीर स्वरुपाचे असून, समाजात दहशत निर्माण करणारे आहे. जातपंचायतीकडून अशाप्रकारे कृत्य होणे ही बाब गावांतील महिला व मुलींवर अन्याय करणारे व त्यांच्या हक्कापासूनच त्यांना दूर ठेवणारे असे आहे. यास्तव जातपंचायतीचा गैरवापर करुन गैरफायदा घेणाऱ्या आणि जातपंचायतीच्या नावाखाली प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणे ही बाब गंभीर असून, गावांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. तरी सदर वृत्ताची आयोगाने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणी तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे.

तरी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आपण व्यक्तीश: लक्ष घालून योग्य ती उचित कार्यवाही करावी, असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिलेले आहेत. यास्तव आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा १९९३ कलम १२(२) व (३) नुसार त्वरित पाठवावा, ही विनंती.

मा.अध्यक्षांच्या निर्देशाने सादर, सविनय,

आपली,
MMlowane
(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव (अ.का.)

सोबत- वृत्ताची प्रत